# फार्मर्सओआरजी डॉट इन या शेतकऱ्यांच्या ॲपला नामचे पाठबळ

**पुणे (प्रतिनिधी) :** मायविश्व टेक्नोलॉजीने शेतकरी, ग्राहक, घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना एकत्र आणणारा फार्मर्सओआरजी डॉट इन (farmersorg.in) हा प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिल्यामुळे शेतकऱ्याला आपल्या मालाची किंमत ठरवता येणार आहे. पोर्टल तसेच ॲन्ड्रॉईड व आयओएस ॲपच्या माध्यमाचा वापर करून शेतकऱ्याला त्याच्या शेतीमालाची सन्मानाने विक्री करता येईल त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होण्यासही त्याचा उपयोग होईल असे मत प्रसिध्द अभिनेते व नाम फौंडेशनचे नाना पाटेकर यांनी व्यक्त केले.

भाज्या,फ ळे आणि डाळींच्या उपलब्धतेबद्दल व त्यांच्या किंमतीविषयी माहिती देणारा तसेच शेतातून टेबलपर्यंत आणण्यासाठी पडणारा आर्थिक ताण कमी करणारा एक अनोखा डिजिटल प्लॅटफॉर्म पुणेस्थित मायविश्व टेक्नोलॉजीज् तर्फे सादर करण्यात आला आहे. त्याला ङ्मनामम या स्वयंसेवी संस्थेने या उपक्रमाला पाठिंबा दर्शविण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. त्यावेळी नाना पाटेकर बोलत होते. माय विश्वचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, संचालक सुप्रिया लिमये आणि गौरी बापट ,बाळासाहेब नागवडे आदी यावेळी उपस्थित होते.

नाना पाटेकर म्हणाले, शेतकरी शेतीमाल पिकवतो, माल स्वत: शहरात आणतो आणि त्याच्या मालाची किंमत दुसरे कोणीतरी ठरवतो. तो केविलवाणे नजरेने तुम्ही म्हणाल ते खरं म्हणून गप्प बसतो. त्याला त्यासाठी मनाविरुध्द तडजोड करावी लागते. ही तडजोड त्याला अपमानास्पद वाटते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. आता पोर्टल तसेच ॲन्ड्रॉईड व आयओएस ॲपच्या माध्यमातून शेतकरी, ग्राहक,




**फार्मर्सओआरजी डॉट इनला आता नाम फाऊंडेशनचे पाठबळ याची घोषणा करताना मायविश्वचे संस्थापक मंदार जोगळेकर व नाना पाटेकर.**

घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना एकत्र आणणारा जो प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिला आहे त्यामाध्यमातून शेतकऱ्याला तो काय पिकवणार, कधी विकायला काढणार हे माहिती असल्याने तो माझ्याकडे काय शेतीमाल आहे, त्याचा अमुक एक दर आहे हे सांगू शकेल. ज्याला पाहिजे तो त्या शेतकऱ्याशी संपर्क साधेल. त्यामुळे शेतकऱ्याला त्याच्या मालाची किंमत मिळेलच त्याबरोबरच त्याचा आत्मसन्मानही दुखावला जाणार नाही. शेतकरी, ग्राहक, व्यापारी यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले.

फार्मर्सओआरजी डॉट इन (farmersorg.in) हा प्लॅटफॉर्म शेतकरी, ग्राहक, घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना एकत्र आणेल. यामुळे शेतकऱ्यांची सोय होणार असून त्यांना किरकोळ,घाऊक विक्रेते किंवा मोठ्या संस्था तसेच सोसायट्यांच्या गरजा समजतील व ते त्याप्रमाणे प्रतिसाद देतील. प्लॅटफॉर्म पोर्टल तसेच ॲन्ड्रॉईड व आयओएस ॲपच्या रूपात उपलब्ध आहे. हा डिजिटल प्लॅटफॉर्म शेतकऱ्यांना त्यांच्या विक्री योग्य वस्तूंची यादी संभाव्य ग्राहकांसाठी प्लॅटफॉर्मवर पोस्ट करण्यास मदत करेल.तसेच ग्राहकांना देखील त्यांची खरेदीची यादी संभाव्य विक्रेत्यांसाठी पोस्ट करता येईल.